# सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाच्या जाहिरातीबाबत शुद्धिपत्रक क्रमांक-5

1. सिडको महामंडळाने दि. 18.01.2024 रोजी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. सदर जाहिरातीतील मुद्दा क्रमांक 7(2) अन्वये खालीलप्रमाणे काही बदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

   i. सदर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या परीक्षेच्या स्वरुपामध्ये बदल करण्यात आला असून सुधारित परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी:-

| अ.क्र. | परीक्षेचा विषय | एकूण प्रश्न | एकूण गुण | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मराठी | 20 | 20 | मराठी | 120 मिनीटे |
| 2. | इंग्रजी | 20 | 20 | इंग्रजी | |
| 3. | सामान्य ज्ञान | 30 | 30 | मराठी व इंग्रजी | |
| 4. | आकलन क्षमता | 30 | 30 | | |
| 5. | व्यावसायिक ज्ञान | 50 | 100 | | |
| एकूण | | 150 | 200 | | |

   ii. ऑनलाईन अर्ज सादर करताना उमेदवारांना परीक्षा केंद्र निवडण्यासाठी मुंबई/ नवी मुंबई / ठाणे /मुंबई उपनगर या शहरांचा विकल्प देण्यात आला होता अन्वये वर नमूद शहरांतील परीक्षाकेंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार होती मात्र उमेदवारांची संख्या जास्त असल्याकारणाने वर नमूद शहरांसोबतच पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व नागपूर या शहरांमधील परीक्षाकेंद्रांवर परीक्षा घेण्याचे प्रस्तावित आहे. सबब, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यानुसार (Address for Correspondence) परीक्षाकेंद्र नेमण्यात येणार आहे.

   iii. तरी, उमेदवारांना नेमून दिलेल्या परीक्षाकेंद्रावरच परीक्षा देता येईल व परीक्षा केंद्र बदलण्याबाबतची कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक (कार्मिक)

दिनांक-09.01.2025